NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्यापरिषदेच्या ६० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२७ ऑक्टोबर, २०२३ दुपारी १२:३० वा.



**विद्यापरिषदेची ६० वी तातडीची बैठक शुक्रवार, दि.२७ ऑक्टोबर, २०२३ रोजी दुपारी १२:३० वाजता** मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली **विद्यापीठ सभागृहात** आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. आय. जे. तांबोळी<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. विठ्ठल भाऊसो किडगावकर<br>प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन | सदस्या | उपस्थित |
| ११) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १२) | डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. तानाजी नारायण कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | अनुपस्थित |
| १६) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर<br>(मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १७) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. मलिक सगाजी रोकडे<br>प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १९) | डॉ. सिद्राम रामचंद्र पुजारी<br>(अध्यक्ष - रसायनशास्त्र अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २०) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>(अध्यक्ष - सिव्हील इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २१) | डॉ. भाग्येश बलवंतराव देशमुख<br>(अध्यक्ष - मेकॅनिकल इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २२) | डॉ. विजय अनंत आठवले<br>(अध्यक्ष - कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २३) | डॉ. अनिल मारुती साळुंखे<br>(अध्यक्ष- हिंदी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २४) | डॉ. विष्णु बब्रुवान वाघमारे<br>(अध्यक्ष - इतिहास अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २५) | डॉ. विठ्ठल भाऊसो किडगावकर<br>(अध्यक्ष - शैक्षणिक मानसशास्त्र अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २६) | डॉ. सदानंद दिगंबरराव भिलेगावकर<br>(अध्यक्ष - शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| २७) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

## : निमंत्रित :

| अ.क्र. | निमंत्रितांचे नाव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. डी. डी. कुलकर्णी,<br>समन्वयक, (जिओलॉजी ॲन्ड जिओइन्फॉर्मेटिक्स अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २) | डॉ. एस. एन. देशपांडे<br>समन्वयक, (मायक्रोबायोलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. डी. एम. झोंबाडे<br>समन्वयक, (सांख्यिकी आणि बायोसॅस्टीक्स अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. एस. वाय. जाधव<br>समन्वयक, (एन्ट्रेप्रेन्युअरशिप अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. एस. पी. देशमुख<br>समन्वयक, (ॲग्रो केमिकल्स ॲन्ड पेस्ट मॅनेजमेंट अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. ऋषिकेश धनवे<br>समन्वयक, (बायोटेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| ७) | डॉ. एम. एस. कलशेट्टी<br>समन्वयक, (अलाईड हेल्थ सायन्सेस अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| ८) | डॉ. श्रीमती ए. एस. लावंड<br>अध्यक्ष, (कॉसमेटिक टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | डॉ. व्ही. टी. वडेर<br>अध्यक्ष, (इनवॉरमेंटल सायन्स अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. एस. एस. शिरगन<br>समन्वयक, (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ११) | डॉ. श्रीमती एम. ए. निरगुडे<br>समन्वयक, (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्रीमती ए. एन. काटगावकर<br>समन्वयक, (बी–आर्किटेक्चर अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| १३) | डॉ. गुरुसिध्दय्या स्वामी<br>समन्वयक, (कन्नड अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| १४) | डॉ. जी. एन. शेख<br>समन्वयक, (उर्दू / पर्शियन अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. रेवा कुलकर्णी<br>समन्वयक, (संस्कृत अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. महावीर शास्त्री<br>समन्वयक, (पाली / प्राकृत अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. आर. एन. जाधव<br>समन्वयक, (ए.आय.एच.सी.ॲन्ड ए. अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. बाळासाहेब मुळीक<br>समन्वयक, (तत्वज्ञान अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. सोपान मोहिते<br>समन्वयक, (मानसशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २०) | डॉ. रामेश्वर मोरे<br>समन्वयक, (समाजशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २१) | डॉ. प्रकाश व्हनकडे<br>समन्वयक, (ग्रामिण विकास अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| २२) | डॉ. श्रीमती एस. जे. गायकवाड<br>समन्वयक, (विधी अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| २३) | कॅप्टन डॉ. महादेव शामराव थोरात<br>समन्वयक, (एन. सी. सी. अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २४) | डॉ. राजेंद्र वडजे<br>समन्वयक, (एन. एस. एस. अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | अनुपस्थित |
| २५) | डॉ. मारोती घंटेवाड<br>समन्वयक, (लोकप्रशासन अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २६) | डॉ. सुरेश किसनराव पवार<br>समन्वयक, (शारिरीक शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २७) | डॉ. प्रविण वासुदेवराव आडसकर<br>समन्वयक, (ग्रंथालय व माहितीशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २८) | डॉ. रविंद्र चिंचोलकर<br>समन्वयक, (जनसंज्ञापन आणि पत्रकारिता अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| २९) | डॉ. दुर्गेश नरपत वळवी<br>समन्वयक, (समाजकार्य शिक्षण अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३०) | डॉ. अबोली सुलाखे<br>समन्वयक, (संगीत-तबला/पखवाज-नाट्यशास्त्र अस्थायी अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |
| ३१) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर<br>समन्वयक, (कौशल्य विकास अभ्यासमंडळ) | सदस्य | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरुमहोदय यांची ही पहिलीच बैठक असल्याने विद्यापरिषदेच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

विद्यापरिषदेच्या या बैठकीस डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर, डॉ. विजय अनंत आठवले व डॉ. भाग्येश बलवंतराव देशमुख यांनी ईमेलद्वारे/Whatsapp massage द्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

**भावपूर्ण श्रध्दांजली:**

विद्यापरिषदेचे जेष्ठ सदस्य प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि.१५/१०/२०२३ रोजी हदयविकाराने आकस्मित दुख:द निधन झाले आहे. त्यानिमित्त विद्यापरिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.२५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ५९ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणुका विभाग |
| ठराव: | दि.२५ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या ५९ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. | |
| | • सर्व सन्माननीय विद्यापरिषद सदस्यांना तातडीचे बैठक असेल तर २४ तास अगोदर आणि नियमित बैठक असेल तर ७ दिवस अगोदर Softcopy मध्ये कामकाजपत्रक पाठविण्यात येईल असे ठरले.<br>• तसेच विद्यापरिषद बैठकीचे कार्यवृत्तांत तपासणीसाठीच्या गठीत समितीकडे कामकाजपत्रक व त्यांची जोडपत्रांसह पाठविण्याचे ठरले.<br>• पूर्वीच्या बैठकीचे कार्यवृत्तांत मंजूर करणे अशी नोंद करणे.<br>• विषय क्रमांक २ मध्ये Action taken Report चे अनुपालन करणेची बाब घेणे.<br>• अध्यक्षांच्या समोर स्क्रीन ठेवण्याचे ठरले.<br>• तसेच इंग्रजी सेमिस्टर-३ या अभ्यासक्रमाकरीता १० दिवसात Text Book तयार करण्याचे ठरले. तसेच Referance Book अभ्यासक्रमासाठी लावण्याचे सूचित केले.<br>• बीए. भाग-२ इंग्रजी अभ्यासक्रमाकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>१) अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा - अध्यक्ष<br>२) अध्यक्ष, इंग्रजी अभ्यासमंडळाचे - सदस्य<br>३) डॉ. तानाजी नारायण कोळेकर - सदस्य<br>४) डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे - सदस्य<br>• नियमित अभ्यासमंडळांचे अध्यक्ष, अस्थायी अभ्यासमंडळांचे समन्वयक, ज्या बैठकीत अभ्यासक्रम तयार झालेल्या समितीचा अध्यक्ष बैठकीस निमंत्रित म्हणून बोलविण्याचे सर्वानुमते ठरले.<br>• प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्सिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट करिअर डेव्हल्पमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर महाविद्यालयाने गठीत समितीला अद्याप संलग्निकरणाच्या नुतनीकरणाबाबतच्या गठीत समितीला अद्याप निमंत्रित केलेले नाही. समिती जावून आल्यानंतरच ठराव क्र.२६, २७ व ३० बाबत कार्यवाही होईल. तसेच यापुढे समिती पाठविण्याचा अधिकार विद्यापीठाला असावा. त्यानुसार समितीने सदस्यांशी संपर्क साधून तारीख निश्चित करणे. महाविद्यालयाची परवानगी घेणे आवश्यक आहे ती बाब वगळण्यात यावी असे ठरले. संबंधीत महाविद्यालयास १५ दिवसाचा अथवा योग्य वेळ दिला जाईल. त्रिसदस्यीय संलग्निकरण समितीच्या अटीच्या पूर्तता बाबतची समिती येणार असल्याची माहिती महाविद्यालयास देण्यात येईल.<br>• Affiliation Committee & Inspection Committee बाबत वरीलप्रमाणे नियम लागू राहील.<br>• दि.०१ नोव्हेंबर, २०२३ ते दि.१३ नोव्हेंबर, २०२३ महाविद्यालयातील शिक्षकांना दिवाळी सुट्टी देण्याचे सर्वानुमते ठरले. | |

(१) पान क्र. ७ व विषय क्र.३ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**पूर्वीचा ठराव**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत एकदाही नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले नाही अशा महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्यासंदर्भात शासनाने दि.१२/०९/२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनेच्या अनुरोधाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० मधील तरतुदीनुसार संलग्नता का काढून घेण्यात येऊ नये? याबाबत कारणे दाखवा नोटीस पाठविण्याची बाब अधिष्ठाता मंडळाने विद्यापरिषदेकडे सर्वानुमते मान्यतेकरिता शिफारस केली असून सदरील बाब तातडीची असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.

**दुरुस्त केलेला ठराव**

**प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत एकदाही नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेतलेले नाही अशा महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्यासंदर्भात शासनाने दि.१२/०९/२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनेच्या अनुरोधाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२० मधील तरतुदीनुसार संलग्नता का काढून घेण्यात येऊ नये? याबाबत कारणे दाखवा नोटीस पाठविण्याची बाब अधिष्ठाता मंडळाने विद्यापरिषदेकडे सर्वानुमते मान्यतेकरिता शिफारस केली असून सदरील बाब तातडीची असल्याने मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.**

(२) पान क्र. ५९ व विषय क्र.३६ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**पूर्वीचा ठराव**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील बी. सी. ए. भाग २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी वाढीव विद्यार्थी संख्या (११०%) मंजूरी बाबतचा दि.१३/०९/२०२३ रोजी सादर केलेला पडताळणी समितीचा अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने सर्व बाबी तपासून विद्यापरिषदेस अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

१) डॉ. विजय अनंत आठवले - अध्यक्ष
२) प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे - सदस्य
३) डॉ. तानाजी नारायण कोळेकर - सदस्य
४) डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे - सदस्य
५) डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन - सदस्य

| | | |
|---|---|---|
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी या महाविद्यालयातील बी. सी. ए. भाग २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी वाढीव विद्यार्थी संख्येस प्रवेश देण्याबाबत संबंधीत महाविद्यालयाकडून ॲफिडेव्हीट लिहून घेण्याचे ठरले. संबंधीत महाविद्यालयाने पूर्वीच्या पत्राच्या संदर्भानुसार सदर तुकडीसाठी शासन मान्यता घेण्याचे प्रयत्न करावेत. शासनाचा होणारा दंड भरुन प्रथम वर्ष वाढीव तुकडी मान्यता घ्यावी असे ठरले. शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून बी. सी. ए. भाग २ मध्ये प्रवेश देण्यास (Conditional Permission) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारे ४०% पेक्षा जास्त वाढीव प्रवेश दिलेले आहेत त्यांनाही हा नियम लागू राहील. सदर समिती ही इतर संलग्नित महाविद्यालयांची तपासणी करेल असे ठरले.<br>यापुढे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी संख्या देत असताना Intake Capacity, Infrasturcture etc बाबी विचारात घेवून १०% वाढीव विद्यार्थी संख्येस विद्यापीठाकडून मान्यता देण्यात येईल. महाविद्यालयास त्यापेक्षा जादा प्रवेश हवे असल्यास त्यांनी अतिरिक्त वाढीव तुकडीसाठी विद्यापीठाकडे मागणी करावी. त्यानुसार विद्यापीठ पुढील प्रक्रिया करेल असे सर्वानुमते ठरले.<br>बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी आणि ४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या दिलेल्या महाविद्यालयाच्या सर्व बाबींची तपासणी करुन अहवाल देणेसाठी खालील समिती सर्वानुमते गठीत करण्यात आली:-<br>१) डॉ. तानाजी नारायण कोळेकर - अध्यक्ष<br>२) डॉ. डी. एम. झोंबाडे - सदस्य<br>३) डॉ. प्रशांत मारुती पवार - सदस्य<br>४) डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे - सदस्य<br>५) डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन - सदस्य | |
| | (३) पान क्र. ६० व विषय क्र.३७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | **पूर्वीचा ठराव** | |
| | प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता मागील शैक्षणिक वर्षाच्या अनुरोधाने पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता व पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मागील शैक्षणिक वर्षाच्या परिणाम स्वरुपी नैसर्गिक वाढ मंजूर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| | दुरुस्त केलेला ठराव | |
|---|---|---|
| | प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता मागील शैक्षणिक वर्षाच्या अनुरोधाने पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता व पदव्युत्तर पदवी द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमाकरिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या मंजूर करण्याकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्वानुमते ठरले.<br>तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारे ४०% पेक्षा जास्त वाढीव प्रवेश दिलेले आहेत त्यांनाही हा नियम लागू राहील. सदर समिती ही इतर संलग्नित महाविद्यालयांची तपासणी करेल असे ठरले.<br>यापुढे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्षाकरीता वाढीव विद्यार्थी संख्या देत असताना Intake Capacity, Infrasturcture etc बाबी विचारात घेवून १०% वाढीव विद्यार्थी संख्येस विद्यापीठाकडून मान्यता देण्यात येईल. महाविद्यालयास त्यापेक्षा जादा प्रवेश हवे असल्यास त्यांनी अतिरिक्त वाढीव तुकडीसाठी विद्यापीठाकडे मागणी करावी. त्यानुसार विद्यापीठ पुढील प्रक्रिया करेल असे सर्वानुमते ठरले.<br>४०% पेक्षा जास्त वाढीव विद्यार्थी संख्या दिलेल्या महाविद्यालयाच्या सर्व बाबींची तपासणी करुन अहवाल देणेसाठी खालील समिती सर्वानुमते गठीत करण्यात आली:-<br>१) डॉ. तानाजी नारायण कोळेकर - अध्यक्ष<br>२) डॉ. डी. एम. झोंबाडे - सदस्य<br>३) डॉ. प्रशांत मारुती पवार - सदस्य<br>४) डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे - सदस्य<br>५) डॉ. श्रीमती लक्ष्मी चंद्रकांत मुशन - सदस्य | |
| | (४) पान क्र. ६४ व विषय क्र.४१ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | पीएच.डी. अभ्यासक्रम (पेट-९) प्रवेश नियमावली तयार करण्याकरीता गठित तज्ञ समितीने तयार केलेली नियमावलीच्या मान्यतेसाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| | दुरुस्त केलेला ठराव | |
|---|---|---|
| | पीएच.डी. अभ्यासक्रम (पेट-९) प्रवेश नियमावली तयार करण्याकरीता गठित तज्ञ समितीने तयार केलेली नियमावलीच्या मान्यतेसाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन खालीलप्रमाणे दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>• RRC, DRC, CRC, RAC समितीवरील सदस्यांचे किमान २ पीएच. डी. विद्यार्थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच पीएच. डी. मार्गदर्शक असावेत.<br>• विद्यापीठ अनुदान आयोगाचे पीएच. डी. संदर्भातील सर्व नियम पाळण्याचे ठरले. परंतु ज्या विषयात पीएच. डी. गाईड नाहीत त्या विषयाबाबत नियम शिथिल करण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले.<br>• पेट ९ परीक्षा ही वर्षातून दोन वेळा मे व डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात घेणे आवश्यक आहे. त्यानुसार पेट ९ परीक्षेची तारीख निश्चित करावी. तसेच पेट ९ परीक्षाकरीता नियमावली सुधारित करावी असे सर्वानुमते ठरले.<br>• RRC, DRC, CRC, RAC समितीवरील सदस्यांचे नामनिर्देशन होत असताना मा. कुलगुरु महोदय यांनी संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करुन उक्त समितीवर संबंधित सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>• सुधारित नियमावली परीक्षा व मूल्यमापन मंडळामार्फत विद्यापरिषदेकडे येणे आवश्यक आहे. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले विज्ञान शाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच विज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या विज्ञान शाखेतील विविध विषयांचे पदवी प्रथम वर्षाचे पाठ्यक्रमास B. Sc. Part- I १) Physics, २) Chemistry, ३) Botany, ४) Statistics, ५) Microbiology ६) Zoology, ७) Mathematics, ८) Bio-technology, ९) Computer Science, १०) Electronics, ११) Geography, १२) Entrepreneurship, १३) Geology या विषयांच्या अभ्यासमंडळांनी सदरच्या पाठ्यक्रमास मान्यता दिली असून सदरचे विषय विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या दि.२६/१०/२०२३ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्यात आले होते, सदर पाठ्यक्रमास व विज्ञान शाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुपास (Nature of Question Paper) विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेकडून सर्वानुमते मान्यता प्रदान करुन विद्यापरिषदेकडे अंतिम मान्यतेकरिता शिफारस करण्यात आली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले विज्ञान शाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच विज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले विज्ञान शाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच विज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता (NEP), पदव्युत्तर अभ्यासक्रम चालु शैक्षणिक वर्ष २०२३ पासून आणि पदवी अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्ष २०२४ पासून लागू राहील.**<br>• **University Assesment 60% College Assesment 40%**<br>• **Head of Passing - Independent**<br>• **Law Courses & Education Courses Excluded.**<br>• **IKS, G. E. & Minor Subject - online mode करावा, Skill Board ठेवावेत.**<br>• **Minor Subject in another Stream Subject.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या पदवी प्रथम वर्षाचे पाठ्यक्रम (B. Com. Part- I) राष्ट्रीय शै. धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसारतयार करण्यात आलेलेअसूनप्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू करण्यात येणार आहेत. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या विविध अभ्यासमंडळांनी सदरचे पाठ्यक्रम स्विकारून विद्याशाखेकडे शिफारस करण्यात आली. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या दि.२६/१०/२०२३ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्यात आले होते, सदर पाठ्यक्रमास व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुपास (Nature of Question Paper) वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडून सर्वानुमते मान्यता प्रदान करुन विद्यापरिषदेकडे अंतिम मान्यतेकरिता शिफारस करण्यात आली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले मानवविज्ञान विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच मानवविज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.** | अभ्यासमंडळे विभाग |

टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत पाठयक्रम संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळानी त्यांच्या बैठकीमध्ये मंजूर करून मानवविज्ञान विद्याशाखेकडे शिफारस करण्यात आले आहेत. तद्‌नंतर सदर पाठयक्रम दि.२५/१०/२०२३ रोजी मानवविज्ञान विद्याशाखेच्या बैठकीत मान्यतेकरिता सादर करण्यात आले होते. सदर पाठयक्रमास मानवविज्ञान विद्याशाखेकडून सर्वानुमते मान्यता प्रदान करून विद्यापरिषदेकडे अंतिम मान्यतेकरिता शिफारस करण्यात आली आहे. सदर पाठयक्रमांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the Course |
|---|---|
| 1 | B.A. Part-I Marathi |
| 2 | B.A./B.Com/B.Sc. Part-I English (All Under Graduate Courses) |
| 3 | B.A. Part-I Hindi |
| 4 | B.A. Part-I History |
| 5 | B.A. Part-I Political Science |
| 6 | B.A. Part-I Economics |
| 7 | B.A./B. Com. Part-I Kannada |
| 8 | B.A./B.Com. Part-I Urdu |
| 9 | B.A./B.Com. Part-I Persian |
| 10 | B.A. Part-I Sanskrit |
| 11 | B.A. Part-I Prakrit |
| 12 | B.A. Part-I A.I.H.C.& A. |
| 13 | B.A. Part-I Philosophy |
| 14 | B.A. Part-I Psychology |
| 15 | B.A. Part-I Sociology |
| 16 | B.A. Part-I N.C.C. |
| 17 | B.A. Part-I N. S. S. |

सबब, प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले मानवविज्ञान विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच मानवविज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.

| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले मानवविज्ञान विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच मानवविज्ञान विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |
|---|---|---|

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ५ ]</td><td>

**प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखे अंतर्गत पाठयक्रम संबंधित विषयाच्या अभ्यासमंडळानी त्यांच्या बैठकीमध्ये मंजूर करून आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेकडे शिफारस करण्यात आले आहेत. तद्नंतर सदर पाठयक्रम दि.२६/१०/२०२३ रोजी आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या बैठकीत मान्यतेकरिता सादर करण्यात आले होते. सदर पाठयक्रमास आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेकडून सर्वानुमते मान्यता प्रदान करून विद्यापरिषदेकडे अंतिम मान्यतेकरिता शिफारस करण्यात आली आहे. सदर पाठयक्रमांची यादी खालीलप्रमाणे आहे.

**IDS Papers**

<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of the Course</th></tr>
<tr><td>1</td><td>B.Voc. Journalism & Mass Communication Part-I</td></tr>
<tr><td>2</td><td>B.A. Part-I Indian Music</td></tr>
<tr><td>3</td><td>B.A. Part-I Physical Education & Yoga Studies</td></tr>
<tr><td>4</td><td>B.A. Part-I Education</td></tr>
</table>

सबब, प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेने केलेली शिफारस विद्यापरिषदेच्या विचारार्थ.
</td><td>अभ्यासमंडळे विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आलेले आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील पदवी प्रथम वर्षाच्या पाठ्यक्रमास तसेच आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तयार करण्यात आलेले प्रश्नपत्रिकेचे स्वरुप (Nature of Question Paper) यास संबंधीत विषयाच्या अभ्यासमंडळाने आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

- **University Assesment 60% College Assesment 40%**
- **Head of Passing - Independent**
- **Law Courses & Education Courses Excluded.**
- **IKS, G. E. & Minor Subject - online mode करावा, Skill Board ठेवावेत.**
- **Minor Subject in another Stream Subject.**
</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(१)] | **N+२ नुसार सन २०१६ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची संधी मिळण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: संदर्भ क्र.१ पुअहोसोवि/पवमूमं/१०६७, दि.०८/१२/२०२०.<br>२. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा परीक्षेस बसण्याची संधी मिळणेबाबतचा अर्ज.<br>वरील संदर्भ क्र.२ च्या अर्जान्वये N+२ नुसार संधी न मिळालेल्या सन २०१६ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची संधी मिळणेबाबत विधी अभ्यासक्रमाच्या विनंती अर्ज सादर केलेला आहे. याबाबत संदर्भ क्र. १ नुसार दि.१०/१०/२०२० रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.३९(१३) नुसार जुन्या पॅटर्नच्या सर्व विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांकरिता केवळ एक संधी मार्च/एप्रिल २०२० मध्ये परीक्षेकरीता उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यानंतर जुन्या सर्व पॅटर्नच्या परीक्षा घेणे बंद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>त्यानुसार जुन्या पॅटर्नमधील सर्व विद्याशाखेतील मार्च/एप्रिल, २०२० च्या परीक्षेला संधी देण्यात आली होती. तसेच पॅटर्न २००८, २००९, २०१०, २०१३ या जुन्या पॅटर्नच्या परीक्षेच्या संधी बंद करण्यात आल्या होत्या.<br>सबब, विधी अभ्यासक्रमाच्या सन २०१६ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **N+२ नुसार सन २०१६ पूर्वीच्या सर्व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षेस समकक्ष विषय घेवून परीक्षा फॉर्म भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP) नुसार अभ्यासक्रम सुरु होण्यापूर्वी शैक्षणिक वर्ष २००४ ते २०१६ दरम्यानच्या यापूर्वी परीक्षेची संधी न दिलेल्या विद्यार्थ्यांना पुनश्च: संधी देण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [६(२)] | प्रथम वर्ष सत्र १ व २ पारंपारिक अभ्यासक्रमांच्या (Traditional Courses) परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालयीन स्तरावर देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | प्रथम वर्ष सत्र १ व २ पारंपारिक अभ्यासक्रमांच्या (Traditional Courses) परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालयीन स्तरावर देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मात्र या परिक्षांच्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका विद्यापीठामार्फत पुरविल्या जातील व त्यानुसार संबंधित उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन (Assessment) महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावे. सदर उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन २५ दिवसात होवून विद्यापीठास निकाल कळवणे बंधनकारक राहील अन्यथा वेळेत निकाल सादर न करणाऱ्या महाविद्यालयांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. | |

मा. कुलगुरु सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

कुलसचिव
(सदस्य सचिव, विद्यापरिषद)

मा. कुलगुरु
(अध्यक्ष, विद्यापरिषद)